Beed | DAILY | MARATHI | Year-03 | Issue -307 | THURSDAY DT.08 FEBRUARY 2024 | RNI-MAHMAR/2021/80074 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

बीड | दैनिक | मराठी | वर्ष -०३ | अंक -३०७ | गुरूवार,दि.०८ फेब्रुवारी २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२१/८००७४ | । किंमत ३ रु | । पाने ४




दैनिक • महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | परभणी | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955

## मनसेसोबत बैठक हा नवीन मुद्दा नाही



# पंकजा मुंडे यांना राज्यसभेवर पाठवायचे का नाही हे केंद्रीय नेतृत्व ठरवेल - देवेंद्र फडणवीस

नागपूर /प्रतिनिधी

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेसोबत झालेली बैठक हा नवीन मुद्दा नाही. मनसेसोबत अशा अनेक बैठकी झाल्या आहेत. अलीकडच्या काळात झालेली बैठकही नियमित होती. त्यात नवीन काहीच नाही. आगामी निवडणूक डोळ्यापुढे ठेवत ही बैठक झाल्याच्या वावड्या उठल्या आहेत. मात्र हे सर्व चुकीचे असल्याचे स्पष्टीकरण भाजप नेते तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे.

दरम्यान राज्यसभेच्या उमेदवारीबाबत सर्वच पक्षांची मोर्चेबांधणी सुरू आहे. राज्यसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर देवेंद्र फडणवीस आणि पंकजा मुंडे यांची भेट झाली होती का? याबद्दल माध्यमांनी प्रश्न विचारला असता देवेंद्र फडणवीस यांनी भूमिका स्पष्ट केली आहे.

देवेंद्र फडणवीस पुढे बोलताना म्हणाले की, पंकजा मुंडे आणि माझी संघटनेच्या विषयानिमित्त नेहमीच भेट होत असते. पण आमच्या भेटीत राज्यसभेच्याबाबत कोणतीही चर्चा झालेली नाही. राज्यसभेत कोण जाणार? याचा निर्णय आमचे वरिष्ठ घेत असतात. पंकजा मुंडे या राष्ट्रीय मंत्री आहेत. त्यामुळे त्यांना राज्यसभेत पाठवायचे की आणखी कोणते पद द्यायचे हे केंद्रीय नेतृत्व ठरवेल, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी असे म्हटले आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, विदर्भात नझुलच्या जमिनी मोठ्या प्रमाणात आहे. या जमिनींच्या हस्तांतरणाची मोठी अडचण होती. सरकारच्या नियमांमध्ये शर्तभंग झाला असल्यास अशांना २०२५ पर्यंत नोंदीसाठी कर न आकारता सूट देण्यात आली आहे. पाच टक्क्यांची अटही दोन टक्क्यांवर आणण्यात आली आहे .

### उदगीरचा प्रकार अंधश्रद्धेतून घडलेला नाही

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, उदगीर पोलिस स्टेशनच्या परिसरात बोकड कापण्याचा प्रकार अत्यंत चुकीचा आहे. मात्र यासंदर्भात चुकीची माहिती पसरविण्यात आली आहे. बोकड कापल्याचा प्रकार अंधश्रद्धेतून घडलेला नाही, असा खुलासात्मक पुनरूच्चार देवेंद्र फडणवीस यांनी केला. फडणवीस म्हणाले की, उदगीर पोलिस ठाण्यात गुन्हे कमी करण्यासाठी बोकड कापण्यात आलेला नाही. पोलिस ठाण्यातील एका पोलीस कर्मचाऱ्यांने नवीन वाहन खरेदी केले होते. त्यामुळे त्याने पार्टी दिली.

## विवाहितेच्या डोळ्यात लिंबू पिळून भानामती करणाऱ्यांची नावे विचारली

अंबाजोगाई – प्रतिनिधी

सासऱ्याने विवाहितेच्या माहेरी येऊन गावातील मारुतीच्या मंदिरात तिच्या डोळ्यात लिंबू पिळून तुझ्यावर कुणी करणी केली आहे, अशी विचारणा विवाहितेकडे केली तेव्हा तिने अंगात आल्याचे भासवून गावातील पाचजणांची नावे सांगितली. दरम्यान,बदनामी केल्याप्रकरणी माहेरकडीलबाबुराव एकनाथ बोडके यांनीअंबाजोगाई ग्रामीण ठाण्यात दिलेल्यातक्रारीवरून पाच जणांवर गुन्हादाखल झाला असून पोलिसांनी त्यांनाअटक केली आहे. अंबाजोगाईतालुक्यातील वरपगाव येथे ५ फेब्रुवारीरोजी हा प्रकार घडला.



## बदनामी केल्याने अंबाजोगाई ठाण्यात पाच जणांवर गुन्हा, आरोपींना अटक

कानडी बदन येथील महिला वैष्णवीसाखरे हिच्या सासरचे लोक धनंजयराजाराम जाधव, मंदाकिनी धनंजयजाधव, ज्ञानेश्वर बळीराम जाधव,बालासाहेब साखरे हे तिच्याअंबाजोगाई तालुक्यातील वरपगाव येथेमाहेरी गेले होते. तेव्हा गावातीलबाबुराव एकनाथ बोडके, शशिकलाएकनाथ बोडके यांना गावातील हनुमानमंदिरात बोलावून घेण्यात आले होते.विवाहितेचे सासरे बालासाहेब साखरेयांनी वैष्णवी साखरे हिच्या डोळ्यातलिंबू पिळत तुझ्यावर कुणी करणीकेली आहे त्यांची नावे आम्हाला सांग,असा विवाहितेवर दबाव आणला.तेव्हा विवाहिता वैष्णवी साखरे हिनेअंगात आल्यासारखे करून बाबुरावएकनाथ बोडके, शशिकला बाबुरावबोडके, दिलीप रामभाऊ माळी, मीरादिलीप माळी, विश्वनाथ पांचाळ यांनीकरणी केल्याचा आरोप केला.

### जादूटोणा प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल

याप्रकरणी विवाहिता वैष्णवी साखरे, तिचे सासरे बालासाहेब साखरे(रा.कानडी बदन, ता.केज) यांच्यासह धनंजय राजाराम जाधव, मंदाकिनीधनंजय जाधव, ज्ञानेश्वर बळीराम जाधव (रा.वरपगाव, ता. अंबाजोगाई)यांच्याविरुद्ध जादूटोणा प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल केला. सहायकपोलिस निरीक्षक आर.एम. जगताप तपास करत आहेत.

## कृषी विभागाच्या पुरस्काराच्या रकमेत चौपट वाढ

### कृषिमंत्री धनंजय मुंडे यांची माहिती

मुंबई ।प्रतिनिधी

राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत शेती क्षेत्राशी संबंधित उल्लेखनीय कार्याकरिता देण्यात येणाऱ्या विविध पुरस्कारांच्या रकमेत चौपट वाढ करण्यात आली आहे, अशी माहिती कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे. ते म्हणाले, शेती व शेतीपूरक क्षेत्रामध्ये अतिउल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यास अथवा संस्थेस कृषी विभागामार्फत दरवर्षी विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी वेळोवेळी कृषी पुरस्कारांच्या रकमेत वाढ करण्याची घोषणा ठिकठिकाणी केली होती. या घोषणेची पूर्तता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मान्यतेने आज करण्यात आली आहे.



पुरस्कारांची संख्या आणि पुरस्कार विजेत्यांचा भत्ता सुद्धा वाढविण्यात आला आहे.

विविध कृषी पुरस्कारांची संख्या, पुरस्काराच्या सुधारित रकमा व कंसात पुरस्कारांची संख्या पुढीलप्रमाणे–डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार (१) पूर्वीची रक्कम ७५००० होती ती वाढवून ३ लाख रुपये देण्यात येतील.वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कार(८), जिजामाता कृषी भूषण पुरस्कार (५) आणि कृषिभूषण ( सेंद्रिय शेती) पुरस्कार(८), उद्यान पंडित(८) या चारही पुरस्कारांची रक्कम प्रत्येकी ५० हजार वरून २ लाख रुपये इतकी वाढवण्यात आली आहे. तर वसंतराव नाईक शेती मित्र पुरस्कार(३) व युवा शेतकरी पुरस्कार(८) या पुरस्कारांसाठी पूर्वी ३० हजार रुपयांची रक्कम देण्यात येत होती ती आता १ लाख २० हजार रुपये करण्यात आली आहे.

तर वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार सर्वसाधारण गट(३४), वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार आदिवासी गट(०६) दोन्ही पुरस्कार रक्कम ११ हजार वरून ४४ हजार रुपये वाढ करण्यात आली आहे.

## जिल्हाधिकारी दिपा मूधोळ मुंडे यांच्या उपस्थितीत

बीड ।प्रतिनीधी

राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त आणि विकास महामंडळ आणि सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांच्या संयुक्त विद्यमानाने समन्वयक मेळावा जिल्हाधिकारी दिपा मुधोळ-मुंडे यांच्या उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात मंगळवारी संपन्न झाला आहे.या मेळाव्यास जिल्हाधिकारी, श्री. झा, जिल्हा अग्रणी बँक अधिकारी, जिल्हयातील सर्व जिल्हा समन्वयक अधिकारी तसेच तिन्ही महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक उपस्थित होते व कर्ज प्रकरणाच्या अडचणी व समस्या मांडण्याकरिता अर्जदार हजर होते. जिल्हा अग्रणी बँक अधिकारी व सहाय्यक आयुक्त यांनी माहे फेब्रुवारी २०२४ अखेरपर्यंत सर्व प्रलंबित कर्जप्रकरणांचा निपटारा करण्यात यावा असे निर्देश दिले आहेत.




## आरटीई प्रवेश प्रक्रियेचा शासनाला विसर

### प्रवेश प्रक्रिया सुरू करा मनोज जाधव यांची शिक्षणमंत्र्या कडे मागणी

बीड ।प्रतिनिधी

शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत राबविल्या जाणाऱ्या आरटीई प्रवेश प्रक्रिया डिसेंबर महिन्यात सुरू होणे अपेक्षित होते. मात्र, अद्याप आरटीई प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली नाही. त्यामुळे, यंदा राज्य शासनाला 'आरटीई' प्रवेश प्रक्रियेचा विसर पडला आहे की काय? असा सवाल विचारला जात आहे. यात आता शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी मुख्यमंत्री,शिक्षणमंत्री आणि शिक्षण संचालक यांना निवेदन देत आरटीई प्रवेश प्रक्रिया लवकरात लवकर सुरू करण्याची मागणी केली आहे.

राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यासाठी पाठवलेल्या प्रस्तावावर अद्याप शासनाने कोणताही निर्णय घेतला नाही. त्यामुळे, २०२४- २५ या शैक्षणिक वर्षातील 'आरटीई' प्रवेश प्रक्रिया रखडली आहे. परिणामी, हजारो पालक चिंतेत असून 'आरटीई' प्रवेश प्रक्रिया कधी सुरु होणार याची वाट पाहत आहेत. शिक्षण हक्क कायद्यानुसार ही प्रक्रिया वेळेत होणे गरजेचे आहे जेणे करून विद्यार्थी शिक्षणा पासून वंचित राहू नयेत परंतु वारंवार शिक्षण विभागाकडून होत असलेल्या विलंबामुळे शासनच शिक्षण हक्क कायद्याला छेद देत बालकांना शिक्षणापासून दूर ठेवण्याचा डाव आखत तर नाहीना असा प्रश्न उपस्थित होत आहे.

शिक्षणात गरीब – श्रीमंत असा भेद भाव न होता गरिबांच्या मुलांना देखील चांगले शिक्षण मिळावे या हेतूने हा कायदा अंमलात आणला मात्र दर वर्षी उशिराने होणाऱ्या या प्रवेश प्रक्रिये मुळे जून पर्यंत विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत नाहीत परिणामी त्यांना या प्रवेशाला मुकावे लागते आणि आरटीई प्रवेशाच्या जागा मोठ्या प्रमाणात रिक्त राहतात. आपल्या पाल्याचे आरटीई प्रवेश व्हावा यासाठी राज्यभरातील पलक प्रवेश प्रक्रियेच्या प्रतीक्षेत आहेत

## राजेन्द्र चव्हान यांचे दु:खद निधन

बीड:- मा.जी.प.सदस्य मा.मदनराव (भाऊ) चव्हाण यांचे जेष्ठ सुपुत्र राजेंद्र मदनराव चव्हाण यांचे बुधवार दि. ०७ फेब्रुवारी रोजी सकाळी हृदयविकाराच्या तीव्र झटक्यामुळे निधन झाले . ते मनमिळाऊ स्वभावाचे असल्यानं नातेवाईक व मित्र परीवरांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. नाथापूर या ठिकाणी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याच्या पश्चात वडील ,भाऊ पत्नी, मुले ,मुली . दैनिक



मराठवाडा पत्र वतीने भावपूर्ण श्रद्धांजली.

# संकलेश्वर मंदिराच्या मलबा हटविणे व उत्खननाच्या कामास ३५.७३ लक्ष रुपयांचा निधी मंजूर

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई शहराच्या ऐतिहासिक आणि धार्मिक भावनांशी जोडल्या गेलेल्या जोगाई सभामंडप लेणी (हत्तीखाना) स्मारकाच्या जतन व दुरुस्तीसाठी राज्य शासनाच्या वतीने २ कोटी ४९ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आल्या नंतर लगोलग शहरालगत असलेल्या संकलेश्वर मंदिराच्या (बाराखांबी) मलबा हटविणे व उत्खनन करणे यासाठी ३४ लक्ष ७३ हजार १०८ रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने या संदर्भात शासन निर्णय क्र. पुवसं-२०१८/प्र.क्र.२६/सां.का.३ दि. ५ फेब्रुवारी २०२४ अन्वये हे आदेश काढण्यात आले आहेत. या शासन निर्णयात पुढे असे म्हटले आहे की, सकलेश्वर मंदिर (बाराखांबी) परिसरातील मलबा हटवणे व आंबेजोगाई शहर परिसरात उत्खनन करणे कामास संदर्भाधीन शासन निर्णय पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. पुवसं-२०१८/प्रक्र२६/सांका.३ ८ मार्च २०१८ च्या शासन निर्णयान्वये रु.२०,२०,२००/- इतक्या । रकमेस प्रशासकीय मान्यता व रु.४,००,०००/- इतक्या रकमेस वित्तीय मान्यता देण्यात आली होती. त्यातून सकलेश्वर मंदिर व आंबेजोगाई शहर परिसरातील गवेषणाचे काम अंशतः पूर्ण झाले आहे. मध्यंतरी कोविड-१९ च्या महामारीच्या काळात भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने कोणत्याही प्रकारच्या गवेषण व उत्खननास परवानगी दिली नाही. त्यामुळे गवेषण व उत्खनन करणे शक्य झाले नाही. आता भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, गवेषण व उत्खनन विभाग, नवी दिल्ली यांनी या परिसरात गवेषण करण्याकरीता एक वर्षाची परवानगी दिली आहे. त्यानुसार या कामाकरीता आवश्यक असलेल्या रकमेपैकी रु.३४,७३,१०८/- इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्याची विनंती संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय यांनी संदर्भाधिन क्र.०२ च्या पत्रान्वये केली आहे. त्यानुसार सकलेश्वर मंदिर (बाराखांबी) परिसरातील मलबा हटवणे व आंबेजोगाई शहर परिसरात उत्खनन करणे कामास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. वरील प्रस्तावाप्रमाणे या शासन निर्णयाद्वारे सकलेश्वर मंदिर (बाराखांबी) परिसरातील मलबा हटवणे व आंबेजोगाई शहर परिसरात उत्खनन करणे कामास रु.३४,७३,१०८/- (अक्षरी रुपये चौतीस लक्ष त्र्याहत्तर हजार एकशे आठ मात्र (सर्व करासह) प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. सदर निधी मागणी क्र. झेडडी-०२, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, २२०५ कला व संस्कृती (००) १०३, पुरातत्वशास्त्र, (०१) (०६) राज्यातील ऐतिहासिक व सांस्कृतिकदृष्ट्या महत्वाचे किल्ले व धार्मिक स्थळे यांची जपणूक संरक्षण (कार्यक्रम) २२०५ १३०२ २७ लहान बांधकामे या लेखाशिर्षातील सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील मंजूर अनुदानातून उपलब्ध निधीतून भागविण्यात यावा. संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय यांना यासाठी नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास या संबंधीच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे. असे या आदेशात म्हटले आहे.सदरील शासन निर्णय हा महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने निगर्मित करण्यात आला



### आ. नमिता मुंदडा यांचे प्रयत्न

सदरील निधी उपलब्ध करून घेण्यासाठी केज विधानसभा मतदारसंघाच्या आ. नमिता मुंदडा यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. आ. नमिता मुंदडा या स्वतः एक आर्किटेक्ट असून केज विधानसभा मतदारसंघातील पुरातत्व काळातील वास्तु आणि मंदिरे जतन करून त्यांची दुरुस्ती करण्याच्या कामांवर त्यांचे विशेष लक्ष आहे. याच माध्यमातून त्यांनी जोगाई सभामंडप दुरुस्ती साठी विशेष निधी मिळवून देण्यासाठी राज्याच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडे सतत पाठपुरावा केला होता.

### संकलेश्वर मंदिराचे धार्मिक महत्व

११ व्या शतकातील चालुक्य कालीन स्थापत्य कलेचा उत्तम नमुना असलेल्या येथील (संकलेश्वर) बाराखांबी मंदीर हा प्राचीन काळातील वास्तुकलेचा अत्यंत मौलिक असा ठेवा आहे.बारा दगडी खांबाच्या आधारावर अत्यंत सुबक आणि रेखीव कोरीव काम केलेल्या या मंदिरातील तळघरात शिव मंदिर आहे. ज्या बारा दगडी खांबावर हे मंदिर उभे आहे त्या बाराही खांबावर अत्यंत देखणे शिल्प कोरल्या गेले आहे. शिवाय या परिसरात अत्यंत देखण्या व अर्धवट फोडलेल्या अनेक मुर्तींचे भग्न अवशेष पहावयास मिळतात. या मंदिराचे वैभव टिकवून ठेवण्यासाठी शिवप्रेमी मंडळींनी मागील काही वर्षांपासून येथे वार्षिक उत्सव ही चालू केला आहे.

संपादकीय

# निरोगी शरीरासाठी नियमित व्यायाम गरजेचा

जसजसे वय वाढते तसतसे वाढत्या वयाचा परिणाम केवळ चेहऱ्यावरच नव्हे तर शरीराच्या इतर भागावरही दिसू लागतो. यात वेगळे असे काहीही नाही, ते पूर्णपणे नैसर्गिक आहे. काही लोक म्हणतील, मला त्याची पर्वा नाही आणि काही लोक असा युक्तिवाद करू शकतात की, हे पूर्णपणे नैसर्गिक आहे, याबद्दल काहीही केले जाऊ शकत नाही. पण काही लोक हे सत्य स्वीकारतील आणि म्हणतील, होय, मला याची काळजी आहे आणि तंदुरुस्त राहण्याचा आणि माझ्या वयापेक्षा तरुण दिसण्याचा कोणता मार्ग आहे का? माझा ठाम विश्वास आहे की, जे लोक त्यांच्या वयापेक्षा चांगले आणि तरुण दिसण्याचा प्रयत्न करतात ते सामान्यतः सकारात्मक, महत्त्वाकांक्षी आणि उत्साही असतात. मी लोकांच्या या गटाला आनंदी आणि शांत म्हणणार आहे.

वयाची चाळिशी, पन्नाशी आणि त्याहून अधिक झाल्यावर त्याचा परिणाम चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसू लागतो. स्नायू कमकुवत होऊ लागतात. अगदी सतर्कता, ताकद आणि चपळताही कमी होते. ही नैसर्गिक प्रक्रिया आहे. पण आनंदी आणि शांत प्रकारचे लोक हे मान्य करत नाहीत. त्यांना ही वृद्धत्वाची प्रक्रिया शक्य तितकी कमी करायची असते किंवा वृद्धत्वाचे परिणाम आणि कारणे कमी करायची असतात. औषधाच्या अनेक प्रणाली, विशेषतः पारंपरिक औषध, वृद्धत्वाचा प्रभाव कमी करण्यासाठी टिप देतात. यामध्ये योग आणि ध्यान हे उल्लेखनीय आहेत. खरं तर, या विषयावर इतर अनेक शिफारस केलेले पर्याय/पद्धती आहेत ज्याबद्दल नेटवर वाचता येते. असे असूनही गुरुत्वाकर्षण, मेंदू आणि नलिका ही संकल्पना अद्भुत आणि फायदेशीर आहे.

तुम्ही गुरुत्वाकर्षणाच्या अधीन आहात हे साधे सत्य तुम्हाला माहीत असणे आवश्यक आहे. तुमच्यावर गुरुत्वाकर्षण सतत कार्यरत असते. गुरुत्वाकर्षण सर्व काही पृथ्वीकडे खेचते आणि तुमचे शरीर त्याला अपवाद नाही. गुरुत्वाकर्षणाची खालची शक्ती तुमची त्वचा आणि स्नायू सैल करते, मग ती तुमच्या कपाळावरची त्वचा असो, डोळ्यांखाली, गाल किंवा स्नायू असो. त्याचे तीन परिणाम दिसून येतात. सुरकुत्या, चेहऱ्याच्या स्नायूंमध्ये शिथिलता आणि शरीराच्या स्नायूंमध्ये अशक्तपण. त्यामुळे वयानुसार तुमचा चेहराही बदलू लागतो. साहजिकच, मोठ्या वयात तुमच्यावर गुरुत्वाकर्षण अधिक वर्षे कार्य करत असल्याने तुमच्या चेहऱ्यावर आणि शरीरावर तरुणांपेक्षा जास्त परिणाम होतो आणि परिणामी तुमच्या शक्तीवरही विपरीत परिणाम होतो.

खरं तर समस्येचा पहिला आणि सर्वात महत्त्वाचा भाग ओळखल्यानंतर आणि परिभाषित केल्यानंतर आपल्याला गुरुत्वाकर्षणामुळे वृद्धत्वाचा घटक संबोधित करणे आवश्यक आहे. येथे काही विचार आहेत ज्यांचा तुम्हाला विचार करणे आवश्यक आहे. व्यायामाच्या कमतरतेमुळे स्नायू शोषून जातात आणि तुमच्या विचारापेक्षा लवकर कमकुवत होतात. व्यायामामुळे विश्रांतीच्या या प्रक्रियेचा सामना करण्यास मदत होते. कारण व्यायामामुळे रक्ताचे परिसंचरण वाढते आणि तुमचे स्नायू तंदुरुस्त, कडक आणि बळकट राहतात. त्यामुळे तुमचे हृदय तंदुरुस्त ठेवले जाते. तुमच्या मेंदूला ऑक्सिजन पुरवला जातो. तुमची तणाव पातळी कमी करण्यास मदत करतो आणि एंडोर्फिन, डोपामाइन सारखी निरोगी रसायने तयार करतो.

स्वत:ला निरोगी आणि बळकट ठेवण्यासाठी तुम्ही नियमित व्यायाम करावा. तुम्ही लहानपणापासूनच व्यायाम करायला सुरुवात केली तरी चालेल. पण जर तुम्ही व्यायाम केला नसेल तर काळजी करू नका, तुम्ही आता पण सुरू करू शकता. एकदा तुम्ही पन्नाशी ओलांडली की, तुमच्या शरीराच्या रचनेनुसार थोडा वेग कमी करा, पण सातत्य राखा. फिटनेस हा एक प्रवास आहे, हे लक्षात ठेवा. माझ्या वैयक्तिक अनुभवाच्या आधारे, मी सुचवू शकतो की, चाळिशीनंतर आदर्शपणे, तुम्ही दर आठवड्याला सुमारे २४० ते ३०० मिनिटे जोमाने व्यायाम करू शकता आणि पन्नासीनंतर, हा कालावधी दर आठवड्याला २०० ते २४० मिनिटे असावा. व्यायामाची ही मिनिटे अंदाजे ४ ते ५ दिवस किंवा आठवडे विभागली पाहिजेत.

तुमच्या शरीराला किती झोपेची गरज आहे, हे तुम्हाला माहीत असले पाहिजे. तुमच्या दैनंदिन नित्यक्रमात तुम्हाला किती तासांची झोप मिळेल याची खात्री करा.

# विडा येथिल श्री.हनुमान विद्यालयाची शैक्षणिक सहल उत्साहात

## प्रक्षेणीय स्थळे,गडकिल्ले पाहून विद्यार्थांचा आनंद द्विगूणीत

केज । प्रतिनिधी

विडा येथिल श्री.हनुमान विद्यालयाच्या वतीने दरवर्षी प्रमाणे यंदाही शैक्षणीक सहलीचे आयोजन करण्यात आले होते.सहलीमध्ये विविध प्रक्षेणीय स्थळे व गडकिल्ले पाहून विद्यार्थ्यांचा आनंद द्विगूणीत झाला होता.सहलीमध्ये १२० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.संस्थेचे सचिव धैर्यशील देशमुख हे देखिल विद्यार्थ्यांच्या समवेत शैक्षणीक सहलीत सहभागी झाले होते.

केज तालुक्यातील विडा येथिल श्री हनुमान विद्यालयाची शैक्षणिक सहल दि.२८/०१/२०२४ ते २ /२/२०२४ या दरम्यान उत्साहात संपन्न झाली आहे.सहलीमध्ये शाळेतील १२० विद्यार्थी १२ शिक्षक शिक्षकत्तेर कर्मचार्यां समवेत संस्थेचे सचिव धैर्यशिल देशमुख देखिल सहलीमध्ये सहभागी झाले होते.शैक्षणीक सहल रविवार दि.२८/०१/ २०२४ रोजी संध्याकाळी १० वा.श्री हनुमान विद्यालयाच्या प्रांगणातून निघाल्यानंतर नरसोबाचीवाडी-कन्हेरीमठ-ज्योतीबा-पन्हाळा-नानिज-गणपतीपुळे-महाड-रायगड,प्रतापगड-महाबळेश्वर-जेजूरी-मोरगाव ईत्यादी ठीकाणी प्रक्षेणीय स्थळे गड किल्ले पाहून दि.२/२/२०२४ रोजी विडा येथे शाळेच्या प्रांगणात दाखल झाली.सहलीमध्ये प्रक्षणीय स्थळ व गडकिल्ले पाहून विद्यार्थ्यांचा आनंद द्विगूणीत झाला होता.सहलीसाठी श्री देशमुख जे.बी,ईंगळे सर,देशमुख बी.एच मुख्याध्यापीका सौ.चव्हाण मॅडम,श्री कुलकर्णी सर व सर्व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.दरम्यान सहलीच्या नियोजनाचे सर्व गावकार्यांकडून कौतुक अभिनंदन होत आहे.



# समृध्द जीवनासाठी शिक्षणाबरोबरच संस्कार महत्त्वाचे- सतिश कुलकर्णी

माजलगाव ।प्रतिनिधी

येथील श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात विद्यार्थी वार्षिक स्नेहसंमेलन बक्षीस वितरण समारंभ प्रसंगी सतिश कुलकर्णी (महामंत्री- संस्कार भारती, पश्चिम महाराष्ट्र) बोलत होते यावेळी त्यांनी सांगितले की, माणसाच्या जीवनातील समृध्दी ही शिक्षणामुळे येते यात शंका नाही पण शिक्षणाला संस्कारांची जोड असेल तर अधिक सुखकर होईल, श्री सिद्धेश्वर शाळेतून शिक्षणाबरोबरच संस्कार देण्याचे काम सातत्याने केले जाते, उच्च विद्याविभूषित होऊन उच्च पदावर काम करता येईल पण प्रामाणिकपणा हा गुण संस्कारातून मिळत असतो, खूप शिक्षण घेतले म्हणजे आपण यशस्वी झालो असे नाही तर आपल्याला आवड असलेल्या कोणत्याही क्षेत्रात आपण यशस्वी होऊ शकतो याचे अनेक उदाहरणे आपल्या भाषणातून सांगितले.

स्नेहसंमेलन बक्षीस वितरण समारंभाच्या दुसऱ्या सत्राचे अध्यक्ष प्रा चंद्रकांत मुळे (अध्यक्ष- स्वा सावरकर महाविद्यालय समिती , बीड) तर व्यासपीठावर केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रकाश दुगड, अमरनाथ खुर्पे, उमेश जगताप, श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, शाळेचे मुख्याध्यापक अनंतराम कोपले सर, स्नेहसंमेलन प्रमुख आदिनाथ कुंडकर, सह स्नेहसंमेलन प्रमुख शिवशंकर भंडारे, विद्यार्थीनी प्रतिनिधी कु सुमेधा कुलकर्णी, विद्यार्थी प्रतिनिधी चि लक्ष्मीकांत गवते इत्यादी उपस्थित होते. या कार्यक्रमाची सुरुवात संमेलन गीत, दिपप्रज्वलन व माता सरस्वती व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करुन झाले. यावेळी बैठे कवायत प्रकार घेण्यात आले, महाराष्ट्राची लोकधारा स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक प्राप्त गीतांचे सादरीकरण करण्यात आले तसेच कलोपासक मंडळाच्या 'चित्रमंजिरी' व संगणक विभागाच्या 'संगणकाचे अंतरंग' या अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर स्नेहसंमेलना निमित्त सर्व मंडळांतर्गत घेण्यात



आलेल्या स्पर्धेतील द्वितीय क्रमांक प्राप्त विजेत्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप करताना प्रा चंद्रकांत मुळे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी खेळाबरोबरच अभ्यास व आपल्या आवडीनिवडीची जोपासना करावी, आपल्या संस्थेतून आदर्श नागरिक घडविण्याचे काम केले जाते, सर्व बक्षीस पात्र विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन ज्यांना बक्षीस प्राप्त झाले नाही अशांनी पुढील वर्षी अधिक प्रयत्न करत यश संपादन करावे यासाठी शुभेच्छा दिल्या. सर्व मंडळाच्या बक्षीसांचे वाचन रोहित खिंडरे यांनी तर क्रीडा विभागाचे बक्षीस वाचन क्रीडाध्यापक पंडित मेंडके यांनी केले. या सत्राचे प्रास्ताविक करताना स्नेहसंमेलन प्रमुख आदिनाथ कुंडकर यांनी अभ्यासपूरक मंडळांतर्गत असलेल्या सर्व मंडळांचा परिचय दिला व संपन्न झालेल्या सर्व स्पर्धांचा अहवाल सादर केला. आभार पर्यवेक्षक कमलाकर झोडगे यांनी मानले तर सुत्रसंचलन श्रीमती सत्यभामा मोरे यांनी केले कार्यक्रमाची सांगता संपूर्ण वंदे मातरम् ने झाली. यावेळी संस्था सभासद, माता पिता पालक, पत्रकार, नागरिक तसेच शाळेचे उपमुख्याध्यापक विठ्ठल काळे, पर्यवेक्षक रवींद्र खोडवे, सदाशिव ढगे, कमलाकर झोडगे ,परमेश्वर आदमाने, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.




# वार्षिक स्नेहसंमेलन हे विद्यार्थ्यांच्या सुप्तगुणांचे प्रदर्शन

## ईगलवुड इंग्लिश स्कूलमध्ये मोठ्या उत्साहात वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाले

माजलगाव ।प्रतिनिधी

सदरील कार्यक्रम हा दि.३० जानेवारी आणि ३१ जानेवारी या दोन दिवशी मुलांच्या उत्स्फूर्त सहभागात पार पडला. पहिल्या दिवशीच्या सोहळ्याचे अध्यक्ष डॉ.शरद पवार सर आणि संतोष लिंबकर सर,मिलिंद गरबडे सर,प्रकाश रोकडे सर,परमेश्वर तौर सर,किशोर मोताळे सर,पी.जी.घोडके सर,संतोष दिवाण सर,डॉ.अर्चना पवार मॅडम,डॉ.सुशील लोढा, ड.शैलेश पवार आदी मान्यवर उपस्थित होते.तर सोहळ्याच्या दुसऱ्या दिवशी अध्यक्ष म्हणून डॉ.सुशील भैय्या लोढा सर आणि सुहास मोराळे सर, एच.स. घनटाजी सर,लक्ष्मण जगताप सर,रमेश वजीर सर, बी.एस.गवळी सर,सरला बिंदू मॅडम, ए.आर.ठेंगसे सर, ड.मधुकरराव पवार,डॉ.शरद पवार सर,डॉ.अर्चना पवार मॅडम आदी मान्यवर उपस्थित होते.या दोन दिवसीय स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांचा उत्सफूर्त सहभाग आणि त्यांच्या कला आविष्काराला पालकांचा उदंड प्रतिसाद यामुळे संमेलन नेत्रदीपक झाले.यावेळी संस्थेचे सचिव आ.डॉ.शरद पवार सर आणि संस्थेचे विश्वस्त आ.डॉ. सुशील भैय्या लोढा सर यांनी शाळेच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले.तसेच या सोहळ्याला पाहुणे म्हणून माजलगाव शहरातील आणि तालुक्यातील शाळांच्या मुख्याध्यापकांना आमंत्रित करण्यात आले होते.मुलांचा सर्वांगीण विकास घडवणारा शिक्षकच या सन्मानाचा अधिकारी आहे,म्हणूनच ही संकल्पना राबवण्यात आली.कार्यक्रमातील नृत्य,अभिनय,सूत्रसंचालन अशा कौशल्यांचा विकास विद्यार्थ्यांमध्ये झालेला पाहून सर्वच पाहुण्यांनी शाळा व्यस्थापनाचे,मुख्याध्यापकांचे,शिक्षकांचे आणि विद्यार्थ्यांचे कौतुक केले.हे स्नेहसंमेलन यशस्वी पार पाडण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक अशोक काळे सर, उपमुख्याध्यापक नानासाहेब हापसे सर, सांस्कृतिक विभाग प्रमुख अर्जुन तौर सर, नृत्य विभाग प्रमुख गौरव सहस्त्रबुद्धे सर, शाळेचे सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी यांनी मेहेनत घेतली.

# बेलगाव येथे आ.सुरेश धस यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटप

आष्टी ।प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील बेलगांव येथे लोकनेते आ.सुरेश धस यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद शाळा व अंबिका विद्यालय येथे आ.सुरेश आण्णा धस मित्र मंडळाच्या वतीने शालेय साहित्य वाटप करण्यात आले. लातूर, बीड,धाराशिव मतदार संघाचे दमदार आमदार सुरेश धस यांचा वाढदिवस संपूर्ण मतदारसंघात सामाजिक उपक्रमांने साजरा केला जात आहे.या आवाहनाला प्रतिसाद बेलगाव ग्रामस्थांच्यावतीने शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना ग्रामपंचायत सदस्य अमृत पोकळे म्हणाले की, आ. सुरेश धस यांचा वाढदिवस अतिशय स्तुत्य सामाजिक उपक्रमाने महाराष्ट्रभर साजरा करण्यात येत आहे. या समाज उपयोगी कार्यक्रमाचा सर्वांनी आदर्श घेऊन असे कार्यक्रम राबवावेत.

यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रविण पोकळे म्हणाले, लोकनेत्याचा वाढदिवस कसा असतो त्याचे आदर्श उदाहरण संपूर्ण मतदारसंघात नव्हे तर जिल्ह्यात व इतर जिल्ह्यात देखील आमदार सुरेश धस यांच्या वाढदिवसानिमित्त अत्यंत सुंदर समाज उपयोगी कार्यक्रम त्यांच्या वाढदिवसानिमित्त पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी घेतल्याने त्यांना वाढदिवसाचे एक आगे वेगळे भेटच मिळाली यावर्षी मिळालेली सर्वत्र यावर्षी पाहायला मिळत आहे.

युवा उद्योजक प्रवीण वारे म्हणाले, आमदार सुरेश धस यांचा वाढदिवस आम्ही यावर्षी जरी शालेय साहित्यांनी वाटप आणि करत असलो तरी पुढील वर्षी ५० हजार रुपयांच्या शालेय स्पर्धा आयोजित करून विद्यार्थ्यांना खेळ आणि स्पर्धेतून पर्वणी एक पुढील वर्षी निर्माण करणारा आहोत.अभ्यासाबरोबर शारीरिक व्यायामाचे देखील विद्यार्थ्यांना तेवढीच गरज असून विद्यार्थ्यांचा अभ्यास व खेळाप्रती आकर्षण वाढले पाहिजे हाच हेतू आमचे नेते आ.सुरेश धस यांचे असून याच पार्श्वभूमीवर त्यांचा वाढदिवस समाज उपयोगी कार्यक्रमाने आम्ही राबवत आहोत. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच तात्यासाहेब शिंदे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून युवा उद्योजक प्रवीण वारे माजी उपसरपंच संजय पोकळे ग्रामपंचायत सदस्य अमृत पोकळे,पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रविण पोकळे,उपसरपंच सतीश पोकळे हे होते तर यावेळी माजी सरपंच मधुकर पोकळे,जालिंदर बाबा पोकळे, ग्रामपंचायत सदस्य मारुती सरोदे, शत्रुघ्न पोकळे,रामहरी पोकळे, किशोर पोकळे,राजेंद्र खंडागळे,मुख्याध्यापक दयानंद सोनवणे, शिक्षक रघुनाथ खंडागळे,शिक्षक शिवाजी घोडके,शिक्षक गणेश म्हस्के,शिक्षिका निता कुलकर्णी,शिक्षिका सबिया शेख यांच्याशह ग्रामस्थ,विद्यार्थी उपस्थित होते.तर या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षक रघुनाथ खंडागळे यांनी केले तर आभार मुख्याध्यापक दयानंद सोनवणे यांनी मानले.

# समान नागरी संहिता विधेयक धामी सरकारने केला मंजूर

## उत्तराखंडचं ऐतिहासिक पाऊल!

**पुष्कर सिंह धामी सरकारने समान नागरी संहिता विधेयक विधानसभेच्या अधिवेशनात मंजूर केले आहे. यूसीसी विधेयक मंगळवारी सभागृहात मांडण्यात आले. दोन दिवसांच्या प्रदीर्घ चर्चेनंतर बुधवारी सरकारने यूसीसी विधेयक बहुमताने मंजूर केले आहे.**

विधानसभेच्या तिसऱ्या दिवसाचे कामकाज सुरू होताच काँग्रेसच्या आमदारांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. यूसीसी विधेयकावर सुधारणा आणि शिफारशी मागवून हे विधेयक निवड समितीकडे पाठवण्याची मागणी करण्यात आली.

मंगळवारी जेव्हा हे विधेयक मांडण्यात आले तेव्हा सभागृह वंदे मातरम आणि जय श्री रामच्या घोषणांनी दुमदुमले. सभापती ऋतु खंडुरी यांच्या मंजुरीनंतर मुख्यमंत्री धामी यांनी हे विधेयक मांडले. यावेळी भाजप आमदारांनी वंदे मातरम आणि जय श्री रामच्या घोषणा देण्यास सुरुवात केली.

### विधेयक मंजूर झाल्यानंतर राष्ट्रपतींकडे मंजुरीसाठी जाणार

विधानसभेच्या अध्यक्षा ऋतु खंडुरी यांनी सांगितले की, उत्तराखंड विधानसभेत यूसीसी विधेयक मंजूर झाल्यानंतर ते राष्ट्रपतींच्या मंजुरीसाठी पाठवले जाईल. त्यांनी सांगितलं की, हे विधेयक सभागृहात मंजूर झाल्यानंतर ते आधी राज्यपालांकडे त्यांच्या मंजुरीसाठी पाठवले जाईल आणि त्यानंतर राज्यपाल हे विधेयक मंजुरीसाठी राष्ट्रपतींकडे शिफारस करतील. राष्ट्रपतींच्या मंजुरीनंतरच उत्तराखंडमध्ये हे विधेयक लागू होईल.




### समान नागरी संहितेचे ठळक मुद्दे:

लग्नाचे वय: यात सर्व धर्मातील मुलींसाठी विवाहाचे किमान वय १८ आणि मुलांसाठी २१ वर्षे निश्चित केले आहे.

विवाह नोंदणी: लग्नानंतर सहा महिन्यांच्या आत विवाह नोंदणी अनिवार्यपणे करावी लागेल.

घटस्फोट: पती ज्या आधारावर घटस्फोट घेऊ शकतो, त्याच आधारावर आता पत्नीही घटस्फोटाची मागणी करू शकते.

बहुपत्नीत्व: पती किंवा पत्नीच्या हयातीत दुसरे लग्न करणे म्हणजेच बहुपत्नीत्वास सक्त मनाई असेल.

वारसा: मुला-मुलींना वारसा हक्कात समान अधिकार मिळतील.

लिव्ह इन रिलेशनशिप: लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहण्यासाठी नोंदणी करावी लागेल. विवाहित पुरुष किंवा महिला लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहू शकणार नाहीत.

# बीडच्या सचिनने भारताला वर्ल्ड कपमध्ये पोहचवले

नवी दिल्ली : दक्षिण आफ्रिकेच्या धरतीवर सध्या अंडर-१९ विश्वचषकाचा थरार रंगला आहे. ५० षटकांच्या या विश्वचषकात भारताने सुरूवातीपासूनच चमकदार कामगिरी केली. मंगळवारी भारताच्या युवा ब्रिगेडने यजमानांना नमवून फायनलचे तिकिट मिळवले. उपांत्य सामन्यात भारतासमोर दक्षिण आफ्रिकेचे आव्हान होते. पण, मराठमोळ्या सचिन धसने शानदार खेळी करून भारताला विजय मिळवून दिला. मूळचा बीडमधील असलेल्या सचिनने ९६ धावांची अप्रतिम खेळी केली. त्याच्याशिवाय भारतीय कर्णधार उदय सहारनने ८१ धावांची खेळी केली. भारतीय कर्णधाराने १२४ चेंडूत ६ चौकारांच्या मदतीने ८१ धावा करून भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला.

भारतीय संघाने ४८.५ षटकांत ८ बाद २४८ धावा करून फायनलचे तिकिट मिळवले. सचिन धसने ११ चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने ९५ चेंडूत ९६ धावांची खेळी केली. आफ्रिकेने दिलेल्या २४५ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना भारताला सुरूवातीला ४ मोठे धक्के बसले. आघाडीचे फलंदाज आदर्श सिंग (०), अर्शिन कुलकर्णी (१२), मुशीर खान (४) आणि प्रियांशू मोलिया (५) स्वस्तात माघारी परतले. पण मराठमोळ्या सचिन धस आणि कर्णधार उदय सहारन यांच्यात मोठी भागीदारी झाली. त्यांनी दोघांनी मिळून पाचव्या बळीसाठी १८७ चेंडूत १७१ धावा कुटल्या.



आफ्रिकन गोलंदाज बळी घेण्यासाठी तरसताना दिसले. पण, सचिन धसला बाद करून यजमानांनी घरच्या चाहत्यांना सुखद धक्का दिला. शतकापासून केवळ ४ धावा दूर असताना सचिन बाद झाला अन् भारताला पाचवा झटका बसला.



बेडूकवाडी येथे जिल्हा हिवताप अधिकारी श्री.विजयसिंह शिंदे यांचा आदेशाने जलद ताप व कंटेनर सर्वेक्षण करण्यात आले, व गावातील लोकांना साथरोग बाबत आरोग्य शिक्षण देण्यात आले, कोरडा दिवस पाळणे, या बाबत माहिती देण्यात आली या वेळी प्रा.आ.केंद्र पिंपळनेर चे आरोग्य निरीक्षक श्री.आर.उगले, श्री.हरी गोरे, व जिल्हा हिवताप कार्यालय कडून श्री.खाडे देवीदास (आ. सा),श्री जाधव व्ही डी, श्री भिलारे पी एन, श्री एस आर पठाण, श्री जाऊंजाळ एस. एस, श्री राऊत एल एम,श्री पी.के मेखले हजर होते.

# वाळूचा हायवा चालू देण्यासाठी मागितली लाच स्थानिक गुन्हे शाखेच्या कर्मचाऱ्यांवर गून्हा दाखल

**प्रतिनिधी । गेवराई**

जिल्ह्यात वाळु तस्करीला पोलीसिंचेच आशीर्वाद असल्याचे लपून राहिलेले नाही. त्यातच आता वाळूचा हायवा चालू देण्यासाठी खाजगी व्यक्तीच्या माध्यमातून लाच घेतल्याप्रकरणी बीडच्या एसीबीने स्थानिक गुन्हे शाखेच्या कर्मचाऱ्याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. एका हायवा चालकाकडून गेवराईत १५ हजाराची लाच घेण्यात आली.बीड जिल्ह्यात वाळूची तस्करी सर्रास सुरु आहे. यासाठी पोलीसांना देखील हप्ते असल्याचे नेहमीच बोलले जाते. त्यातच आता संगम जळगाव ता. गेवराई येथील हायवा चालकास गोदावरी पात्रातून अवैध वाळू उपसा करून शेवगाव जि. नगरमध्ये वाहतूक करण्यासाठी एलसीबीचा कर्मचारी मुकेश गुंजाळ याने १५ हजाराची लाच मागितली. सदरची लाच मुकेश गुंजाळ याच्यासाठी स्वीकारताना एसीबी अर्थात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गेवराईत हॉटेल साईचा मालक प्रमोद कोठेकर याला रंगेहाथ पकडले. या प्रकरणी पोलीसासह खाजगी व्यक्तीविरुध्द गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला जात आहे. सदरची कारवाई सापळा अधिकारी गुलाब बाचेवाड पोलीस निरीक्षक यांनी संदीप आटोळे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि शंकर शिंदे, पोलिस उप अधीक्षक, ला.प्र.वि. बीड यांच्या मार्गदर्शनाखाली व श्रीराम गिराम, अमोल खरसाडे, अविनाश गवळी, गणेश मेहेत्रे, अंबादास पुरी, स्नेहल कोरडे ला. प्र. वि. बीड यांच्या साहाय्याने केली.



## लोकशाही पत्रकार संघ प्रनित सरपंच ग्रामपंचायत विकास समितीच्या प्रदेश उपाध्यक्ष पदी

# श्री सखाराम पोहिकर निवड होताच गढी ग्रामपंचायतचे सरपंच श्री विष्णूपंत घोगडे यांनी केला सत्कार

**प्रतिनिधी । बीड**

गेवराई तालुक्यातील मौजे गढी येथील ग्रामपंचायतचे पाणी पुरवठा कर्मचारी तथा महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी महासंघाचे गेवराई तालुका अध्यक्ष श्री सखाराम पोहिकर यांची सरपंच ग्रामपंचायत विकास समिती च्या प्रदेश उपाध्यक्षपदी निवड होताच गढी ग्रामपंचायतचे कर्तव्य दक्ष सरपंच श्री विष्णूपंत घोगडे व जिल्हा परिषद प्राथमिक शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष श्री महेश (काका ) सिकची यांनी आज दिनांक ६ /२ / २०२४ रोजी सकाळी १० =०० वाजता गढी ग्रामपंचायत कार्यालय या ठिकाणी श्री सखाराम पोहिकर यांचा शाल श्रीफळ पुष्पहार

व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला यावेळी गढी ग्रामपंचायतचे उपसरपंच राजु पठाण व नारायण जाधव आन्ना ससाणे विनोद भोले यांनी स्वागत करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या

# अनाथ बालकांचे प्रतिपालकत्व स्विकारण्यास समाजाने पुढे यावे

## जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी आर.आर.कांगणे

**प्रतिनिधी । नांदेड**

नांदेड:दि.६.नांदेड जिल्ह्यातील बालगृहामध्ये असलेल्या अनाथ व निराधार बालकांना बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या तरतुदीनूसार प्रतिपालकत्व योजनेंतर्गत जी बालके कुटुंबापासून वंचीत आहेत,अशा बालकांना कुटुंबाचे वातावरण,प्रेम मिळवून देण्याचा प्रयत्न आहे.अशा अनाथ बालकांचे प्रतिपालकत्व स्विकारण्यास समाजाने पुढे आले पाहिजे,असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी आर. आर. कांगणे यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे स्वनाथ फाऊंडेशन व महिला बाल विकास विभाग यांची नुकतीच बैठक घेण्यात आली.यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी महिला व बालकांसाठीच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या.तर स्वनाथ फाऊंडेशनच्या संस्थापक व कार्यकारी विश्वस्त श्रीम. श्रेया भारतीय यांनी प्रतिपालकत्व योजनेविषयी चर्चा व स्वनाथ फाऊंडेशनच्या सामाजिक कार्याविषयी माहिती दिली. या बैठकीमध्ये जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी आर. आर. कांगणे यांनी प्रतिपालकत्व योजनेविषयी माहिती व मार्गदर्शन केले. यावेळी कुटुंबातच बालकांचा सर्वांगीण विकास होऊ शकतो, त्यास आई-वडिलांचे प्रेम मिळते. त्याचा तो अधिकार आहे.

ज्यामुळे बालकाच्या सर्वांगीण विकास होतो.यामुळे अनाथ बालकांना प्रतिपालकत्व योजनेंतर्गत इच्छूक कुटुंबात पुन:स्थापीत करण्यास प्राधान्य देण्यात येईल,असे मत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी आर.आर.कांगणे यांनी व्यक्त केले. प्रतिपालकत्व स्विकारण्यास इच्छूकांनी जिल्हा बाल संरक्षण कक्ष,जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,नांदेड यांच्याशी संपर्क साधल्यास इच्छुक कुटुंबाला कायदेशीररित्या प्रतिपालकत्वाच्या नियम व अटी-शर्तीच्या अधिन राहून मुल दिले जाते,असे मत संदीप फुले यांनी व्यक्त केले.यावेळी सर्व सदस्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या बैठकीस परिवीक्षा अधिकारी गजानन जिंदमवार,संरक्षण अधिकारी संदीप फुले,कल्पना राठोड, सामाजिक कार्यकर्ता शितल डोंगे,धानाजी कोंडेवाड तसेच वनस्टॉप सेंटरच्या प्रेमला निलेवार प्रशासक व ताई दर्शने केस वर्कर हे उपस्थित होते.

# धर्माबाद येथील ग्रीनफिल्ड शाळेच्या आठ विध्यार्थ्यांना सुवर्णपदक

## राज्यस्तरीय स्पर्धेसाठी झाली निवड



**प्रतिनिधी । नांदेड**

नांदेड:दि.६.महाराष्ट्र शासन व पुणे युवक क्रीडा संचालनालय यांच्या संयुक्त विद्यमाने हाफकिडो बॉक्सिंग व जीत कुणूडो बॉक्सिंग ही स्पर्धा असोशियन मार्फत विभागीय स्तरावर घेण्यात आली. ज्यामध्ये १४ वर्षाखालील वयोगटातील शालेय क्रीडा स्पर्धा पार पडली. क्रीडा संकुल येथे घेण्यात आलेल्या हाफकिडो बॉक्सिंग व जीत कुणूडो स्पर्धेत धर्माबादच्या ग्रीनफिल्ड नॅशनल स्कुलच्या विद्यार्थ्यांनी आपल्या प्रति-स्पर्ध्यांना हरवत हे यश संपादन केले आहे. ह्यामुळे हे विद्यार्थी विभागीय पातळीवर विजयी होऊन सुवर्णपदकाचे मानकरी ठरले आहे व ह्या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.ह्यामध्ये हाफकिडो बॉक्सिंग मध्ये कु. वैष्णवी राठोड ,मानव पवार व आदित्य कुडमाटे तसेच जीत किंडो स्पर्धेत कु.विशाखा वेलादे, कु.आरुषी पवार, कु.गौरी कुडसंगे,धृप पवार आणि आयुष उईके ह्यांनी विजया सोबतच सुवर्णपदक पटकावले. विभागीय स्तरावर प्रथम क्रमांक पटकावले आहे. ह्या विजयामुळे उपरोक्त सर्व विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

उपरोक्त सर्व खेळाडूंना कराटे प्रशिक्षक दत्तात्रय सितावार यांचे मार्गदर्शन लाभले.इकडे संस्थेचे संचालक शिवराज पा.होटाळकर, मुख्याध्यापक शेख सर,अजय सर, गोविंद पवार, दिगंबर हिंगणे,क्रीडा शिक्षक अहमद लड्डा व संजय उमडे सहित शाळेतील सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांचे पालक आणि तालुक्यातील क्रीडा प्रेमीनीं ह्या सर्व विजयी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करन पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# महावितरण कंपनीकडून पात्रुडकराचा विजेसाठी छळ

**प्रतिनिधी । माजलगांव**

तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत येथे दोन महिन्यांपासून ट्रांसफार्मर देण्यासाठी वीज वितरण कंपनीचे अधिकारी लक्ष देत नसल्याने सरपंच,उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्यांनी बीड येथील वीज वितरण कंपनीच्या अधिक्षक अभियंता कार्यालयासमोर ठिय्या मांडत सोमवार पासून उपोषण सुरू केले आहे.तसेच ग्रामस्थांनी या आधी देखील मोठ्या प्रमाणात रास्ता रोको आंदोलन करण्यात आले होते त्यावेळी देखिल कोणतीच दखल महावितरण घेतली गेली नाही.व या पुढे उन्हाळ्याचे दिवस असल्याने तापमान वाढत आहे रात्री अपरात्री वीजपुरवठा खंडित होत आहे अशा वेळी कर्मचारी वेळेवर उपस्थित होत नसल्याने खासगी व्यक्ती कडुन ते काम करून घ्यावे लागते. या प्रकरणाला वैतागलेल्या ग्रामस्थानी सोमवार पासून महावितरण अधिक्षक कार्यालया समोर उपोषण सूरु करण्यात आले आहे.उपोषनास्थळी सरपंच लतिफ मोमीन, उपसरपंच घनश्याम भुतडा, एकनाथ मस्के, अरुण जंगले, मुख्तार मोमीन, कैलास अलझेडे, मतीन मोमीन, भानुदास भुजबळ, बाबुभाई सय्यद, माऊली नाटकर, जुबेर मोमीन आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# महाराष्ट्रातील सोयाबीन उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात

**प्रतिनिधी । पाटोदा**

महाराष्ट्रातील सोयाबीन उत्पादक शेतकरी आर्थिक संकटाचा सामना करत आहेत. किंमती घसरल्याने आणि सरकारी धोरणामुळे शेतकरी आणि प्रक्रिया युनिट या दोघांवरही नकारात्मक परिणाम झाला आहे. पीक दोन वर्षांपर्यंत साठवले जाऊ शकते, ज्यामुळे शेतकऱ्यांना त्याविरूद्ध पैसे घेता येतात. मात्र, किमान आधारभूत किमतीपेक्षाही भाव घसरल्याने शेतकरी आता कर्ज फेडण्यासाठी धडपडत आहेत. शिवाय, प्रक्रिया करणाऱ्या युनिट्सना कच्च्या मालाची कमतरता भासत आहे. ही परिस्थिती सोडवण्यासाठी कृषी विभाग सरकारकडून धोरणात्मक हस्तक्षेपाची मागणी करत आहे.री विचित्र सापळ्यात सापडले आहेत. सोयाबीनच्या साठवणीच्या स्वरूपामुळे आणि केंद्र सरकारच्या घातक धोरणामुळे सोयाबीन उत्पादक शेतकरी तसेच सोयाबीन प्रक्रिया करणाऱ्या युनिट्सना मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहेया प्रकरणाचा मुख्य मुद्दा हा आहे की सोयाबीन, बहुतेक पिकांप्रमाणे, दोन वर्षांसाठी, घरी देखील साठवले जाऊ शकते आणि बँका गोदामाच्या पावतीवर शेतकऱ्यांना बाजारभावाच्या ७० टक्के कर्ज म्हणून देतात. या वर्षी पिकाची किंमत ४,६०० प्रति क्विंटल या किमान आधारभूत किंमत च्याही खाली घसरल्याने, शेतकऱ्यांनी पीक तीन महिन्यांपेक्षा जास्त काळ गोदामांमध्ये ठेवणे आणि साठ्यावर पैसे उधार घेणे पसंत केले. ७० ते ७५ टक्के पीक गोदामांमध्ये पडून असल्याचा अंदाज आहे.पण आता परिस्थिती झपाट्याने गंभीर होत आहे. एकीकडे शेतकऱ्यांना कर्ज फेडण्याच्या नोटिसा मिळत आहेत तर दुसरीकडे कच्च्या मालाअभावी सोयाबीन प्रक्रिया उद्योगही आर्थिक अडचणीत सापडला आहे. सामाजिक-राजकीयदृष्ट्या प्रभावशाली शेतकरी समुदायातील वाढत्या अशांततेचे निराकरण करण्यासाठी, कृषी विभाग केंद्र सरकारच्या तात्काळ धोरणात्मक हस्तक्षेपासाठी प्रयत्न करत आहे.येथील सोयाबीन शेतकरी उद्धवराव दहिफळे यांनी परिस्थिती सांगितली. ते म्हणाले , ऑक्टोबरमध्ये कापणीच्या वेळी, भाव सुमारे ५,३०० प्रति क्विंटल होते. म्हणून शेतकऱ्यांना भाव प्रति क्विंटल ६,००० पेक्षा जास्त जाण्याची आशा होती आणि त्या वेळी त्यांचा साठा विकण्याची योजना आखली. पण सोयाबीनची किंमत आता सुमारे ४,२०० प्रति क्विंटल आहे, जी ४,६०० च्या एमएसपीपेक्षा ४०० खाली आहे . आम्ही तोटा विकू शकत नाही पण बँका आणि खाजगी गोदाम जमीनमालकांनी आमच्या कर्जाची परतफेड करण्यासाठी आम्हाला नोटिसा बजावल्या आहेत, अन्यथा कर्जाची रक्कम वसूल करण्यासाठी बाजारभावाने पीक विकण्याची धमकी दिली आहे.



येत्या लोकसभा निवडणुकीवर एक डोळा ठेवून खाद्यतेलाच्या किमती नियंत्रित ठेवण्यासाठी आयात शुल्कात कपात करणाऱ्या केंद्र सरकारवर दहिफळे यांनी ठपका ठेवला. या धोरणाची किंमत शेतकरी चुकवत आहेत, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उपाध्यक्ष सत्तार पटेल म्हणाले. तेलावरील आयात शुल्क संरचनेवरील सवलतींची अंतिम मुदत मार्च २०२४ पर्यंत होती. त्यामुळे मार्च २०२४ नंतर सोयाबीनच्या किमती ६,००० प्रति क्विंटलच्या पुढे जातील अशी आशा होती . पण जानेवारी २०२४ मध्ये, केंद्र सरकारने आयात शुल्क सवलती पुढील एका वर्षासाठी मार्च २०२५ पर्यंत वाढवल्या. अशा प्रकारे किंमती सुमारे १,००० प्रति क्विंटल आणि चड्झ च्या खाली घसरल्या.

कच्चा माल न मिळाल्याने राज्यभरातील सोयाबीन प्रक्रिया करणाऱ्या घटकांनाही फटका बसत आहे. किसान मित्र वेअरहाऊस प्रायव्हेट लिमिटेड चालवणारे हेमंत वैद्य म्हणाले, आम्हाला केवळ २५ ते ३० टक्के पीक मिळाले आहे. आम्ही पिकापासून तेल आणि पशुखाद्य तयार करतो. हे असेच चालू राहिल्यास, प्रक्रिया युनिट्स ५० टक्के क्षमतेपेक्षा कमी क्षमतेवर काम करतील आणि पुरेशा भांडवलाच्या अभावी त्याचा आमच्या खरेदी क्षमतेवरही परिणाम होईल.तीन वर्षांपूर्वी, कच्च्या पामतेलावरील आयात शुल्क सुमारे ३०.२५ टक्के असताना सोयाबीनच्या किमती विक्रमी ११,००० प्रति क्विंटलपर्यंत पोहोचल्या होत्या. ऑक्टोबर २०२१ मध्ये, शुल्क ८.२५ टक्के आणि फेब्रुवारी २०२२ मध्ये ते ५.५० टक्के करण्यात आले, ज्यामुळे सोयाबीनवरील अवलंबित्व कमी झाले, ज्यामुळे किंमती घसरल्या. याशिवाय, जून २०२३ मध्ये केंद्र सरकारने रिफाइंड सोयाबीन तेलावरील आयात शुल्क १७.५ टक्क्यांवरून १२.५ टक्के केले. त्यामुळे गेल्या तीन वर्षांत टप्प्याटप्प्याने सोयाबीनच्या भावावर मोठा परिणाम झाला.महाराष्ट्र राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल म्हणाले की, राज्य केंद्र सरकारकडे धोरणात्मक हस्तक्षेपाची विनंती करणार आहे. ते म्हणाले, राज्यातील सोयाबीनच्या लागवडीमध्ये मराठवाडा आणि विदर्भाचा वाटा ८० टक्के आहे. देशातील सोयाबीन प्रक्रियेशी संबंधित सर्व संघटनांनी सोयाबीन डी-ऑइल्ड केक (ऊजउ) किंवा सोया मीलवर सुमारे १५ ते २० टक्के निर्यात अनुदानाची मागणी केली आहे, ज्याचा वापर त्याच्या उच्च प्रथिने मूल्यामुळे पशुखाद्य तयार करण्यासाठी केला जातो. आम्ही त्यांच्या सूचनेला पाठिंबा देतो, कारण यामुळे सोयाबीनची किंमत वाढण्यास मदत होईल आणि शेतकऱ्यांना एमएसपी मिळू शकेल. आम्ही याबाबत पत्र दिले असून केंद्र सरकारला तातडीने हस्तक्षेप करण्याची विनंती केली आहे.महाराष्ट्राचे कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी सांगितले की, सोयाबीनला चांगला भाव मिळावा यासाठी आपण केंद्रीय कृषी मंत्रालयाशी पत्रव्यवहार सुरू केला असून याबाबत चर्चा करण्यासाठी ते दिल्लीला भेट देऊ शकतात.शेतकरी सोयाबीनला प्राधान्य का देतात ?ङ सोयाबीन हे महाराष्ट्रातील खरीप हंगामातील प्रमुख पीक बनले आहे,

# आधार कार्ड अपडेटच्या ज्येष्ठांना मनस्ताप बोटाचे ठसे उमटत नसल्याने हेलपाटे

धारुर ।प्रतिनिधी

वयोवृद्ध व्यक्तीच्या बोटाचे ठसे उमटत नसल्याने आधार कार्ड अपडेट होत नाही त्यामुळे त्यांना अडचणीचा सामना करावा लागत आहे आधार कार्ड अपडेट साठी आधार सेंटर वर वयोवृद्ध शेतकऱ्यांना हेलपाटे मारावे लागत आहेत यामुळे पूर्वीचे आधार कार्ड रद होण्याचा धोका आहे, यातून प्रशासनाने मार्ग काढण्यासाठी मागणी वयोवृद्ध शेतकऱ्यांतून होत आहे राज्यात सर्वत्र आधार कार्ड अपडेट करण्याची प्रक्रिया चालू आहे आधार कार्ड अपडेट मध्ये मोबाईल क्रमांक, ईमेल, जोडावे लागत आहे, आधार कार्ड अपडेट झाल्यानंतर बँक खाते, सातबारा,आठ अ आणि इतर अनेक ठिकाणी लिंक असणे गरजेचे आहे, यामुळे शहरातील ग्रामीण भागातील नागरिक शेतकरी व विद्यार्थी आधार कार्ड अपडेट व इतर आधार सेंटर बाहेर गर्दी करत आहेत युवक युवतीचे आधार कार्ड अपडेट करण्यास अडचण निर्माण होत नाही पण ६० वर्षे पुढील व ज्यांचे मेहनतीने जास्त काम आहे अशा महिला पुरुषांच्या हाताचे बोटाचे ठसे उमटणे कठीण झाले आहे, बोटाचे ठसे उमटत नसल्याने रेशन कार्ड मिळणे सुध्दा मुश्किल झाले आहे आधार कार्ड अपडेट नसल्याने शासकीय योजना बँकाचे व्यवहार,शेतीचे अनुदान आदी कामे खोळंबली आहेत, यामध्ये विशेष करून वयोवृद्ध लोकांची मोठी अडचण होत आहे यातून शासनाने तात्काळ मार्ग काढून हा प्रश्न निकाली काढावा अशी मागणी अनेक नागरिकांतून होते आहे



# त्यागमूर्ती रमाई आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा बसवा – वंचीत बहूजन आघाडी

बीड /प्रतिनिधी

वंचीत बहूजन आघाडीच्या वतीने त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या पुतळ्याचे मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले.

बीड शहरात विविध महापुरुषांचे पुतळे आहेत. यात रमाबाई आंबेडकर यांच्या पुतळा दुर्लक्षित राहिला आहे. या ठिकाणी सर्व पूतळे आहेत परंतू महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अथक परीश्रमाला कष्ठाणे व त्यागाने साथ देणाऱ्या माता रमाईचा पुतळा शहराचे तथा जिल्ह्याचे शासनकर्ते विसरले याच बाबी कडे वंचीत बहूजन आघाडीने लक्ष केंद्रीत केले आहे. येणाऱ्या काही दिवसात माता रमाबाई आंबेडकरांचा पुतळा बसवण्यात यावा याकरिता चार पर्यायी जागेचा निवेदनात उल्लेख केला आहे.बीड रेस्ट हाऊस समोर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन समोर, रस्त्याच्या मधोमद, माळीवेस चौक, थोरसंत गाडगे बाबा महाराज व थोर संतबसवेश्वर अण्णा यांच्या मधल्या स्पेस मधे पेठ बीड परीसर, जुना नगर नाका चौक बीड ,हे चार ठिकाण सुचवण्यात आले आहेत. या निवेदन देतेवेळी वंचीत बहुजन आघाडी चे प्रमुख पदाधिकारी पुरुषोत्तम वीर,डॉ.नितीन सोनवणे, बालाजी जगतकर,अनुरथ वीर,अँड.अनिता चक्रे, पुष्पा तुरुकमाने,शेख युनूस,अँड.राजेंद्र कोरडे,उमेश तूळवे,अजय सरवदे, लखन जोगदंड,नितीन मूजमूले,ए .बी जौंजाळ मिलींद सरपते आदी उपस्थित होते.

# नगरपरिषद कार्यालय अंबाजोगाई येथे कार्यरत असलेले मुख्याधिकारी डॉ .उत्कर्ष गुट्टे यांची निवडणूक आयोगाचे नियम आदेश डावलून बदली

## वंचित बहुजन आघाडी अंबाजोगाई शहराच्या वतीने दिले निवेदन

**अंबाजोगाई / प्रतिनिधी**

**अंबाजोगाई.. निवडणूक आयोगाचे नियम/आदेश डावलून राजकीय द्वेष भावनेतून,सूडबुद्धीने केलेली नियम बाह्य बदली तत्काळ रद्द करण्यात यावी या यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने निवेदन देण्यात आले. नगर परिषद कार्यालय अंबाजोगाई येथे कार्यरत असलेले मुख्याधिकारी डॉ. उत्कर्ष गुट्टे यांची बदली महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाने लोकसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ चे कारण दाखवून करण्यात आली आहे.या बदल्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ च्या अनुषंगाने महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवेतील मुख्याधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. या बदलीत भारतीय निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ४३७/६/१/खछडढ/एउख/ऋणछउढ/चउउ/ २०२३ दिनांक २१/१२/२०२३ या पत्राचा संदर्भ देउन करण्यात आली आहे.**

मुळात ज्या निवडणुक आयोगाच्या संधर्भाने बदली करण्यात आली आहे त्या.भारतीय निवडणूक आयोगाच्या पत्र क्र. ४३७/६/१/खछडढ/ऋणछउढ/चउउ/२०२३ च्या मार्गदर्शक सूचनेतील मुद्दा क्र. (६) बदली धोरणाअंतर्गत समाविष्ट नसलेल्या अधिकाऱ्यांच्या श्रेणी चा उल्लेख केलेला आहे.



या श्रेणीच्या मुद्दा क्र. ६ (ळळ) व ( ीं) मध्ये स्पष्ट नमूद केले आहे की आयोगाची आणखी इच्छा आहे की ज्याच्याविरुद्ध अधीकृत कामकाजाशी संबंधित फौजदारी खटला कोणत्याही न्यायालयात प्रलंबित आहे अशा कोणत्याही अधिकारी यांना संबंधित कर्तव्याशी नियुक्त करण्यात येऊ नये, असे स्पष्ट नमूद असताना आणि डॉ. उत्कर्ष सोपानराव गुट्टे यांच्यावर बीड नगर परिषद मध्ये दिवाणी क्र. – ५६५/२०२२वर मा. न्यायालयाने दि. १०/०३/२०२२ रोजी दिलेल्या स्थगिती आदेशाचा विचार न करता सर्वे नं. ३५ तरफ गिराम तालुका जिल्हा बीड येथील १५६५० चौ. मी. क्षेत्राचा तात्पुरता सिमांकणासाठी अभिन्यास मंजूर केला आहे. याद्वारे त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ या नियम ३ चा भंग केला आहे. म्हणून बीड येथे शहर पोलीस ठाण्यात फौजदारी गून्हा दाखल आहे. व तो खटला प्रलंबित आहे. याकरिता डॉ. उत्कर्ष सोपानराव गुट्टे यांची ही बदली निवडणूक आयोगाच्या आदेशाची अवहेलना करणारी आहे.तरी सदरील माहितीनुसार आपणं ही बेकायदेशीर बदली तात्काळ रद्द करावी ही विनंती..

त्याचप्रमाणे अंबाजोगाई शहर अंतर्गत बरीच विकास कामे सुरु व नगर परिषद हद्दीत येणारे अनधिकृत बांधकाम यांना शासन निर्देशानुसार अधिकृत करणे व शहरातील घरकुल आवास योजना यात पंतप्रधान आवास योजना व रमाई आवास योजना ची संपुर्ण प्रक्रिया राबवत असताना ही बदली करण्यात येऊ नये अशी स्थानिक नागरिकांची मागणी होत आहे त्यामूळे सदरील सर्व नियम व नागरिकांच्या व शहर विकासासाठी आपणं ही बदली रद्द करावी ही विनंती.. असे निवेदन देण्यात आले.

या वेळेस वंचित बहुजन आघाडी चे जिल्हा अध्यक्ष शैलेश कांबळे, शहर अध्यक्ष गोविंद मस्के, शहर महासचिव नितीन बप्पा सरवदे, ऍड के एस तूपसागर, ऍड दिलीप गोरे, तालुका महासचिव सुभाष चोपडे,बहुजन मुक्ती पार्टी चे जिल्हा नेते नासेर भाई शेख ,रमेश गडशिंगे,इड्झ चे सुनिल कांबळे, वंचित बहुजन आघाडी चे मेघराज कांबळे , ब्रिजेश इंगळे, अर्जुन वाघमारे, धम्मपाल कांबळे, शहर प्रवक्ते उमेश शिंदे व इतर कार्यकर्ते पदआधिकरी उपस्थीत होते.

दैनिक • महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | परभणी | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे



## वार्षिक स्नेहसंमेलन हे विद्यार्थ्यांच्या सुप्तगुणांचे प्रदर्शन

माजलगाव : प्रतिनिधी

सदरील कार्यक्रम हा दि.३० जानेवारी आणि ३१ जानेवारी या दोन दिवशी मुलांच्या उत्स्फूर्त सहभागात पार पडला. पहिल्या दिवशीच्या सोहळ्याचे अध्यक्ष डॉ.शरद पवार सर आणि संतोष लिंबकर सर,मिलिंद गरबडे सर,प्रकाश रोकडे सर,परमेश्वर तौर सर,किशोर मोताळे सर,पी. जी.घोडके सर,संतोष दिवाण सर,डॉ.अर्चना पवार मॅडम,डॉ.सुशील लोढा, ड.शैलेश पवार आदी मान्यवर उपस्थित होते.तर सोहळ्याच्या दुसऱ्या दिवशी अध्यक्ष म्हणून डॉ.सुशील भैय्या लोढा सर आणि सुहास मोराळे सर, एच.स. घनटाजी सर,लक्ष्मण जगताप सर,रमेश वजीर सर, बी.एस.गवळी सर,सरला बिंदू मॅडम, ए.आर.ठेंगसे सर, ड.मधुकरराव पवार,डॉ.शरद पवार सर,डॉ.अर्चना पवार मॅडम आदी मान्यवर उपस्थित होते.या दोन दिवसीय स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांचा उत्सफूर्त सहभाग आणि त्यांच्या कला आविष्काराला पालकांचा उदंड प्रतिसाद यामुळे संमेलन नेत्रदीपक झाले.यावेळी संस्थेचे सचिव आ.डॉ.शरद पवार सर आणि संस्थेचे विश्वस्त आ.डॉ. सुशील भैय्या लोढा सर यांनी शाळेच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले.तसेच या सोहळ्याला पाहुणे म्हणून माजलगाव शहरातील आणि तालुक्यातील शाळांच्या मुख्याध्यापकांना आमंत्रित करण्यात आले होते.मुलांचा सर्वांगीण विकास घडवणारा शिक्षकच या सन्मानाचा अधिकारी आहे,म्हणूनच ही संकल्पना राबवण्यात आली.कार्यक्रमातील नृत्य,अभिनय,

सूत्रसंचालन अशा कौशल्यांचा विकास विद्यार्थ्यांमध्ये झालेला पाहून सर्वच पाहुण्यांनी शाळा व्यस्थापनाचे,मुख्याध्यापकांचे,शिक्षकांचे आणि विद्यार्थ्यांचे कौतुक केले.हे स्नेहसंमेलन यशस्वी पार पाडण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक अशोक काळे सर, उपमुख्याध्यापक नानासाहेब हापसे सर, सांस्कृतिक विभाग प्रमुख अर्जुन तौर सर, नृत्य विभाग प्रमुख गौरव सहस्त्रबुद्धे सर, शाळेचे सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी यांनी मेहेनत घेतली.

## छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल येथील कामाची उच्चस्तरीय चौकशी करा

८० लक्ष खर्च करुनही परिस्थिती 'जैसे थे' च

भंडारा / प्रतिनिधी

भंडारा शहरातील खेळाडुंना, तरूणांना एकमेव मैदान असलेले छत्रपती शिवाजी महाराज क्रिडा संकुलाच्या दुरूस्तीसाठी सन २०२० मध्ये जवळजवळ ८५ लक्ष रू. चा निधी मंजुर होवून सदर कामाचे टेंडर प्रक्रिया राबवून काम करण्यात आले. परंतु थातुरमातुर कामे करून कामाचे जवळजवळ पूर्ण पैसे कंत्राटदाराने उचलुनही बरीच कामे झाले नाहीत. जलतरण केंद्राचे जी कामे झाले असली तरी अजुनही जलतरण केंद्र उपयोगात आणता येत नसल्यामुळे हया कामात प्रचंड घोळ असल्याचा आरोप करुन या कामाची चौकशी करण्यात यावी अशी मागणी शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) तर्फे या राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री गिरीश महाजन निवेदनाद्वारे करण्यात येत आहे.छत्रपती शिवाजी महाराज क्रिडा संकुलातील (१) जलतरण केंद्राची दुरूस्तीकरीता २१.९५ लक्ष, (२) ऑफीस व होस्टेल बिल्डींगच्या दुरूस्तीकरीता ३६.७५ लक्ष व (३) टॉयलेट बांधकामासाठी २४.७५ लक्ष रू. चे तीन कामाचे अंदाजपत्रक सा.बां. वि. भंडाराने तयार करून टेंडर प्रक्रिया राबविली. ती



टेंडर प्रक्रिया सुध्दा मॅनेज करण्यात आली. त्यातही नागपूरच्या एम. आर. ढोबळे नामक कंत्राटदाराला हे काम २% कमी दराने काम देण्याचे ठरले. परंतु स्थानिक राजकीय दबावातून ढोबळे या कंत्राटदाराला काम करू न देता मर्जीतल्या राजकीय परंतु कामाचा कोणताही अनुभव नसलेल्या कार्यकर्त्याला पेटी कंत्राटदार म्हणून देण्यात आले आणि इथुनच कामाच्या दर्जाला सुरुंग लावण्याचे काम सुरू झाले. जलतरण केंद्राचे कामामध्ये अंदाजपत्रकात जी कामे दर्शविल्या गेली त्यानुसार जुनी पाईप बदलवून, नवीन पाईपलाईन टाकणे होते, सँड बदलविणे होते, इलेक्ट्रिक पॅनेल बदलविणे, जुन्या टाईल्स काढून खोदकाम करून, मुरूम टाकणे वगैरे सारखी कामे केल्या गेली नाहीत. याखेरीज अन्य कामे सुध्दा थातुरमातुर केल्या गेलीत.दुसऱ्या ऑफीस व होस्टेल बिल्डींगच्या अंदाजपत्रकानुसार फक्त ऑफीसमध्ये कामे केल्या गेलीत, होस्टेल बिल्डींग मध्ये कोणतेही कामे केल्या गेली नाहीत. साधी पेंटींगसुध्दा केली गेली नसल्यामुळे ही बिल्डींग बाबा आदमच्या काळातली दिसते. याच कामामध्ये बास्केटबॉलच्या मैदानावर सिंथेटीक इनॅमल पेंट चे ७ थर लावायचे असतांना केवळ २ थर मारल्यामुळे एका महिन्यामध्येच हे थर उखडायला लागल्यामुळे खेळाडूंना खेळतांना कमालीचा त्रास होत आहे.जुन्या खिडक्या, दारांना पेंटींग केल्या गेली नाहीत. या तीन वेगवेगळया कामासाठी मोजमाप पुस्तिका मात्र एकच वापरल्या गेली असून त्यामध्ये कुठेही स्पष्टता नसुन या सर्व कामांचे बिल कंत्राटदाराला प्रदान करण्यात आले. तरीही मात्र जलतरण केंद्र, बास्केटबॉल ग्राऊंड, होस्टेल सारख्या बाबींचा पूर्णपणे लाभ घेता येत नाही. जलतरण केंद्र तर पुर्णपणे बंदच असल्यामुळे जिल्हयातील जलतरणपटुंवर एकप्रकारे अन्यायच केला जात आहे.अशाप्रकारे न झालेली, न केलेली कामे मोजमाप पुस्तिकेत दाखवून.

## गाळमुक्तीकडे



## बीड जिल्हयातील २०० तलाव गाळमुक्तीकडे

बीड : गाळमुक्त धरण व शिवार योजने अंतर्गत बीड जिल्हयातील सिंचन प्रकल्पातील गाळ काढण्यात येऊन शेतक-यांच्या शेतात नेला जावा तसेच तलावातील पाणीसाठी वाढविण्यासाठी शेतकरी, लोकसहभाग व स्वंयसेवी संस्थांच्या माध्यमातून गाळ काढण्याची कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे. यासाठी बीड जिल्हयात मिशन २०० मोहिम राबविण्यात जिल्हाधिकारी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आज गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेच्या अंमलबजावणी व प्रगतीबाबत बैठक घेण्यात आली.

सदरील बैठकीसाठी विविध कार्यान्वयीन विभागाचे अधिकारी उपस्थित होते. मिशन २०० अंतर्गत गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजने अंतर्गत करावयाच्या कामाचे नियोजन सदरील बैठकीत ककरण्यात आले. मिशन २०० अंतर्गतची सर्व कामांचे आराखडे तात्काळ तयार करुन युध्दपातळीवर सर्व कामे पूर्ण करण्याबाबत संबंधीत यंत्रनेस निर्देश दिले. सदरील तलावातील गाळ काढल्याने तलावाचा मूळ संकल्पीत पाणीसाठा पुनस्थापित होण्याबरोबरच सदरील गाळ शेतात पसरविल्याने शेतात पसरविल्याने शेतजमिनीस नवसंजीवनी प्राप्त होणार आहे.

## वडवणीच्या मोरवडमध्ये जलजीवनच्या कामात गुत्तेदाराचा तकलादूपणा, पाणी पुरवठा विभागाचा मात्र आंधळे पणाला दुजोरा




बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात जल जीवनच्या कामात एकानंतर एक निकृष्ट कामे करुन करोडो रुपयांवर डल्ला मारला जात असल्याचे प्रकार समारे आल्याने राज्यात बीड जिल्हा परिषदेची नाचकी झाली. त्यातच आत्ता पुन्हा वडवणीच्या मोरवड गावात जल जीवनच्या कामातील बोगसपणा समोर आला आहे. कोरडया विहरीतून पाईप लाईन टाकण्याचे काम सुरु असून यामुळे भविष्यात गावाला पाणी मिळणार नाही हे माहित असतांना सुद्धा योजनेतून फक्त पैसे खाण्यासाठी काम केले जात असल्याचे दिसत आहे. यामध्ये पाणी पुरवठा विभागाचे मुख्य अभियंता जवाबदार असून त्यांना निलंबित करण्याची माणगी होत आहे. दरम्यान आहो सीओ साहेब, अडातच नाहीतर पोहर्यात कुठून येणार असा सवाल उपस्थित केला जात आहे. त्यामुळे बोगस काम करणार्या गुत्तेदाराला काळी यादीत टाकण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते प्रकाश उजगरे यांनी केली आहे.

ग्रामीण भागातील जनतेला स्वच्छ व मुबलक पाणी मिळावे म्हणून केंद्र आणि राज्य शासनाने जल जीवन ही महत्वकांक्षी योजना अंमलात आणली. बीड जिल्ह्यात मात्र या योजनेला बीड जिल्हा ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील अधिकारी-कर्मचार्यांसह जिल्ह्यातील गुत्तेदारांनी बाप जाद्यांची जहागिरी समझल्याने या योजनेला गालबोट लागले आहे. बीड जिल्ह्यात जल स्वराज्य आणि भारत निर्माण पाणी पुरवठ्यानंतर आत्ता जल जीवनमध्ये होणार्या बोगस पणामुळे महाराष्ट्रभर बीड जिल्हा परिषदेची नाचकी सुद्धा झाली आहे. मात्र ही योजना गुत्तेदार आणि अधिकारी-कर्मचार्यांसाठी कुरण ठरु लागल्याचे दिसत आहे. कारण पुन्हा जिल्ह्यातील वडवणी तालुक्याच्या मोरवड गावच्या ग्रामस्थांची तहान भागविण्यासाठी जल जीवन योजना मंजूर झाली असली तरी भविष्यात ही योजना कुचकामी ठरणार आहे, अशी ओरड ग्रामस्थांमधुन होत असतांना त्यांच्याकडे दुर्लक्ष करुन थातूर-मातूर काम करुन गुत्तेदाराने घाट घातला आहे. त्याला बीड जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभाग देखील साह्य करत असल्याचे दिसत आहे.

वडवणी तालुक्यातील मोरवड हे साधारणत: सतराशे ते अठराशे लोकसंख्येचे गाव आहे. जवळच असलेल्या उपळीच्या तलावावर गावची तहान भागविली जात होती. परंतू जल जीवन योजनेमुळे मोरवडच्या ग्रामस्थांना हक्काचे पाणी मिळावे म्हणून शासनाने जल जीवन योजनेत गावचा समावेश केला. योजनेतंर्गत गावच्या नजीक असलेल्या सोन्नाखोटा तलावा जवळ जलस्त्रोतून येथील पाणी प्रश्न कायम स्वरुपी मार्गी लावण्याऐवजी तलावा लगत असलेल्या एका खड्यात बोअरवेल पाडून त्यातून टेकडीवर खोदलेल्या नवीन विहरीत पाणी सोडून दिखावा केला गेला आहे. कारण टेकडीवर खोदलेल्या विहरीत पाण्याचा टिपूस देखील लागलेला नाही. विहीर पूर्णपणे कोरडी ठाक असून त्यात पाणी सोडल्यामुळे विहीरला पाणी असल्याचे भासते मात्र ही सरासर फसवणूक आहे.

गावाला पाणी पुरवठा करण्याची योजना संबंधीत गुतेदार आणि पाणी पुरवठा अधिकारी-कर्मचार्यांनी आखली आहे. मात्र कायम स्वरुपी कोरडी ठाक असलेल्या विहिरीतून गावाचा पाणी प्रश्न मिटणार नसून तो अधिकच तीव्र होणार असून गावच्या योजनेच्या नावावर मिळालेल्या योजनेतून शासनाच्या तिजोरीवर दरोडा टाकण्याचा बेत संबंधीत गुत्तेदार आणि प्रशासनातील अधिकारी-कर्मचार्यांनी आखला असल्याचे दिसत आहे. सध्या सोन्नाखोटा येथील तलावाच्या परिसरातील खड्यात बोअरवेल पाडून डोंगर माथ्यावर विहर खोदून पाईप लाईन टाकण्याचे काम केले जात असून अर्ध्या गावापर्यंत पाईप लाईनचे काम झाले असून उर्वरित कामे युद्धपातळीवर करण्यात येत आहेत. त्यामुळे गावातील रस्ते देखील उध्वस्त होणार आहेत. करोडो रुपये खर्च करुन देखील भविष्यात गावच्या पिण्याचा प्रश्न सुटणार नसून या बोगस कामामुळे गावातील रस्त्यांची वाट लागत आहे. सद्य स्थितीत आणि पुढे देखील गावकर्यांना पिण्याच्या पाण्याचा त्रास सहन करावा लागणार आहे. दरम्यान तकलादू कामे उरकून उखळ पांढरे करणार्या संबंधीत गुत्तेदार आणि अधिकारी कर्मचार्यांना मात्र याचे काही देणे नसल्याचे दिसत आहे. त्यामुळे संबंधीत गुत्तेदाराला काळ्या यादीत टाकून भ्रष्ट दोषी अधिकारी-कर्मचार्यांविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी गावातील सामाजिक कार्यकर्ते प्रकाश उजगरे यांनी केली आहे.

## जि.प.माध्य.शाळा भोगलवाडी येथे विविध उपक्रमांचे यशस्वी आयोजन



भोगलवाडी ।प्रतिनिधी

जिल्हा परिषद माध्यमिक शाळा भोगलवाडी तालुका धारूर येथे दिनांक ३ आणि ५ फेब्रुवारी २०२४ रोजी शा.व्य. स. अध्यक्ष श्री. अर्जुनरावजी तिडके आणि मु.अ. श्री. ज्ञानोबा जायभाये यांच्या मार्गदर्शनाखाली माता पालक मेळावा-हळदी कुंकू समारंभ तसेच बाल आनंद मेळावा यशस्वीपणे आयोजित करण्यात आला.

कार्यक्रम प्रसंगी हळदी कुंकवाच्या निमित्ताने माता पालक मेळाव्यामध्ये विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वृद्धिंगत होण्यासाठी शिक्षकांनी मार्गदर्शन केले. तसेच महिलांची उखाणे, रांगोळी, संगीत खुर्ची स्पर्धा उत्साहात आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. विद्यार्थ्यांना गणितासारख्या विषयाचे व्यवहारिक ज्ञान प्रत्यक्षपणे यावे यासाठी खरी कमाईउपक्रमांतर्गत बाल आनंद नगरीचे आयोजन मनोरंजक स्पर्धासह करण्यात आले. सर्व बालक, पालक आणि शिक्षकांनी बाल आनंद मेळाव्याचा आनंद घेतला. उपक्रमांच्या यशस्वीतेसाठी प्रभारी मु.अ. श्रीम.हेमा साळुंके आणि शिक्षक सर्वश्री वैजनाथ बडे,

सूर्यकांत खडके, अशोकराव नाईकवाडे,संतोष कांडणगिरे, संजय मारकवाड, श्रीम. गौळण घुगे, हनुमंत लांब बाळासाहेब करडकर आणि परिचर श्रीम. छाया जाधव यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे अतिशय सुंदर नियोजन आणि सूत्रसंचालन शिक्षक श्री. श्रीहरी बडे यांनी केले.




## श्री संत भाऊ बाबा पुण्यतिथी निमित्त कार्यक्रमाचे आयोजन

शिरुर कासार ।प्रतिनिधी

सालाबाद प्रमाणे याही वर्षी शिरूर कासार येथे प्रातःस्मरणीय श्री संत वामनभाऊ महाराज राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या संयुक्त पुण्यतिथीचे आयोजन करण्यात आले असून यानिमित्त भव्य मिरवणूक निघणार असून रात्री आठ ते दहा ह भ प राम महाराज शास्त्री आळंदी देवाची यांचे जाहीर कीर्तन होणार आहे या कार्यक्रमाचा सर्व भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन पुण्यतिथी उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे

दिनांक सात फेब्रुवारी रोजी सकाळी दहा वाजता वैभव व्यायाम शाळे वारणी येथे श्री संत वामनभाऊ महाराज व श्री संत भगवान बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येईल दुपारी चार वाजता वैभव व्यायाम शाळा ते स्वर्गीय लोकनेते गोपीनाथराव् मुंडे चौक जिजामाता चौक मेन रोडने राजे छत्रपती संभाजी महाराज चौक अशी भव्य शोभायात्रा निघणार आहे या शोभायात्रेमध्ये कलशधारी महिला टाळ मृदंगाच्या गजरामध्ये या प्रतिमांची भव्य मिरवणूक निघणार असून येथील नागेबाबा बँकेच्या पाठीमागे ही मिरवणूक विसर्जित होणार असून या ठिकाणी रात्री सहा ते आठ श्री क्षेत्र आळंदी देवाची येथील श्री ह भ प राम महाराज शास्त्री यांचे अमृततुल्य कीर्तन होणार आहे या अगोदर महाप्रसाद ही होणार असून या सर्व कार्यक्रमाचा शिरूर कासार व पंचक्रोशीतील भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन भाऊ बाबा पुण्यतिथी उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे

## भूमी अभिलेख विभागातील नमुना नं ३३ व ३४ नोंदीचे अभिलेख फेरतपासणी करा-सकल मराठा समाजाची मागणी

शिरूर कासार / प्रतिनिधी

मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी सध्या कुणबी नोंदी साठी महसूल, भूमीअभिलेख या सहित अनेक ठिकाणी काम चालू असून यामधे प्रामुख्याने मोडी, फसली, उर्दू , या भाषेतील दस्तऐवज असून त्यासाठी योग्य अभ्यासकांची गरज असून काही अभ्यासकडून या दस्तचे योग्य वाचन होत नसल्याने अनेक समाज बांधवांना अडचणी ठरतं आहेत त्यामुळे या दस्त वाचन योग्य व्हावे न्याय मिळावा यासाठी पुन्हा नवीन अभ्यासक नेमून तालुक्यातील सर्व महसुली गावाचे पुन्हा दस्ताची फेर तपासणी करावी अशी मागणी शिरूर तालुक्यातील सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात भूमी अभिलेख कार्यालयात करण्यात आली आहे . यावेळी निवेदन स्वीकारताना कार्यालय प्रमुख अल्पेश पाटील , निवेदन देताना प्रदीप गुजर, निवृत्ती बेद्रे,



भारत पानसंबळ, उध्दव घोडके, कल्याण तांबे, दिपक खोले, आण्णा तांबे, आप्पासाहेब तांबे, बाबासाहेब नेटके,संभाजी नेटके, अर्जुन पानसंबळ, भारत धामणे, सुभाष पानसंबळ, सुरेश पानसंबळ, पांडुरंग अभंग, हरी कोटुळे, अशोक मोरे यांच्यासह तालुक्यातील अनेक समाजबांधव उपस्थित होते.

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे,

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra).
Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com,
epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com